Jagdamba Education Society's
# Santosh N. Darade Polytechnic
At.Babhulgaon, Tal.Yeola, Dist.Nashik- 423 401
Accredited by NBA NATIONAL BOARD OF ACCREDITATION

## * Central Library *

Please Consider the Environment Before Printing…

**Date: 09/05/2025**

## Activity Name: Day Special

## दिन विशेष

**News Paper Name: आपलं महानगर**

**Page No. 04**

# दिनविशेष

## मेवाडचे राजे महाराणा प्रतापसिंह



प्रताप सिंह पहिला किंवा महाराणा प्रताप हे सिसोदिया घराण्यातील मेवाडचे राजपूत राजा होते. मुघल साम्राज्याच्या विस्तारवादी धोरणाचा प्रतिकार करण्यासाठी त्यांनी १५७६ मधील हळदीघाटीच्या लढाईसह अकबराविरुद्ध अनेक मोठ्या लढाया केल्या. गनिमी युद्धाद्वारे त्यांच्या लष्करी प्रतिकारासाठी प्रताप लोकनायक बनले. या तंत्राचा उपयोग नंतर मलिक अंबर याने केला. पुढे छत्रपती शिवाजी महाराजांनी मुघलांविरोधात गनिमी काव्याचा उपयोग केला. इंग्रजी दिनदर्शिकेनुसार महाराणा प्रताप यांचा जन्म ९ मे १५४० रोजी कुंभलगढ दुर्ग येथे झाला होता. परंतु राजस्थानातील राजपूत समाजातील काही गट त्यांचा जन्मदिवस हिंदु तिथीनुसार साजरा करतात. महाराणा प्रताप यांनी त्यांच्या आईकडून युद्ध कौशल्याचे शिक्षण घेतले होते.

महाराणा प्रताप यांच्याकडे चेतक नावाचा घोडा होता. या घोड्यामुळे महाराणा प्रतापांना अनेक लढाईमध्ये यश मिळाले होते. हळदीघाटी युद्धात चेतकचा मृत्यू झाला. महाराणा प्रताप यांनी मुगलांसोबत अनेक युद्धे केली, परंतु हळदीघाटीचे युद्ध सर्वात महत्त्वपूर्ण मानले जाते. १५७६ मध्ये झालेल्या या युद्धात जवळपास २० हजार सैनिकांना सोबत घेऊन महाराणा प्रताप यांनी मुगलांच्या ८० हजार सैनिकांचा सामना केला होता. हळदीघाटी युद्धादरम्यान जेव्हा मुघल सेना महाराणांच्या पाठी धावत होती, तेव्हा चेतक घोड्याने राणांना अनेक फूट लांब असलेल्या नाल्यावरून उडी मारून पार केले होते. हळदीघाटी येथे चेतकची समाधी बांधलेली आहे. महाराणा प्रताप यांच्या भाल्याचे वजन ८१ किलो होते. सोबतच त्यांच्या छातीचे कवच ७२ किलो वजनाचे होते. १५९६ मध्ये शिकारीला गेले असताना महाराणा यांना जखम झाली. मात्र ती जखम कधीही बरी झाली नाही. १९ जानेवारी १५९७ रोजी ५७ व्या वर्षी त्यांचा मृत्यू झाला.

Nashik Edition

May 09, 2025 Page No. 4

Powered by: erelego.com

S.N.D. POLYTECHNIC, BABHULGAON
CENTRAL LIBRARY
YEOLA DIST. NASHIK

LIBRARIAN
MR.U.D. MULANI
SND POLYTECHNIC
YEOLA-423401

PRINCIPAL
PROF.U.B JADHAV
SND POLYTECHNIC
YEOLA-423401